देशोन्नती दि. 10-11-23

ड Live

२३ ■ https://www.deshonnati.com

# गंठण पळविणाऱ्या चोरट्यांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या

## पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची पत्रकार परिषदेत माहिती

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ शहरातील रस्त्यावर भरदिवसा महिलेच्या गळयातील सोन्याचे गंठण हिसकावून घेऊन पोबारा करणाऱ्या दोन चोरट्यांच्या पोलिसांनी अवघ्या काही दिवसात मुसक्या आवळल्या. त्यांच्याकडून चोरुन नेलेल्या दोन बुलेट व १ लाख ५० हजार रुपये किमतीचे ४९ ग्रॅम सोने असा एकूण ४ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत गुरुवारी दिली.

भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन ते तीन दिवसांत महिलांच्या गळयातील सोन्याचे गंठण हिसकावून घेऊन दुचाकीवरून चोरटे पसार होत असत. दरम्यान पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी चोरट्यांचा शोध घेऊन अटक करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार भाग्यनागर ठाण्याचे पोनि सुर्यमोहन बोलमवाड यांनी टीमसह साध्या गणवेशात पेट्रोलिंग सुरू केली असता ते मालेगाव मार्गावरून जात असताना बुलेटवर जाणाऱ्या दोन संशयितांना पकडले. आरोपी तौफिक खान आयुब खान (२४) रा. बिलालनगर व सलमान खान असलमखान (२८) रा. अदनान गार्डन धनेगाव यांची चौकशी केली असता त्यांनी भाग्यनगर केलेल्या चोरीची कबुली दिली. गुन्ह्यात वापरलेल्या बुलेट तेलंगणा राज्यातील बोधन येथून चोरून आणल्याचीही कबुली दिली. पोलिसांनी यामध्ये दोन बुलेट व १ लाख ५० हजार रुपये किमतीचे सोने असा एकुण ४ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केल्याचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी यावेळी सांगितले. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, स्थागुशाचे पोनि सुर्यमोहन बोलमवाड, धर्माबादचे पोनि अभिषेक शिंदे, लिंबगावचे सपोनि चंद्रकांत पवार, सपोनि विजय चव्हाण यांची उपस्थिती होती.



अप्पर पोलिस अधीक्षक खंडेराय धरणे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत संपत यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अभिषेक शिंदे यांनी तालुक्यातील मदनूर येथील एका संशयितास ताब्यात घेतले आहे. त्याने शिक्षक कॉलनी येथून एक मोटारसायकल चोरल्याची कबुली दिली आहे. त्याच्याकडून २ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या ४ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. तसेच धर्माबाद येथील ३ गुन्हे व उमरी येथील एक गुन्हा उघडकीस आणला आहे.

लिंबगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका व्यक्तीच्या संपर्कात असलेल्या भामट्याने ऊसतोडसाठी मजूर पुरवितो म्हणून त्यांना नांदेडला बोलावून घेतले होते. ते आल्यानंतर कमी किंमतीत सोने देतो असे म्हणून वरखेड येथे शिवारात बोलावून घेऊन ८ साथीदाराच्या मदतीने १० लाख रुपये बळजबरीने घेऊन गेले. याप्रकरणी लिंबगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे, यातील आरोपी अनिल कमी मारकुळे रा. वसमत यास लिंबगाव ठाण्याचे सपोनि चंद्रकांत पवार यांनी अटक केली असून ईतर आरोपींची नावे निष्पन्न करण्यात पोलिसांना यश आले.